वर्ष : ०५ | अंक: २५ | मुंबई, मंगळवार १४ मे २०१९ ते २० मे २०१९ | पृष्ठ: ४

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

# पोलीस बातमी पत्र

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

WeWite: www.policebatmipatra.com www.policebatmipatra.in

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 झोपडीत मूळ मालक राहत नसल्यास पात्रता रद्द होणार!

3 → या आत्महत्यांना जबाबदार कोण?

मराठा विद्यार्थ्यांना कोर्टाचा दिलासा ← 4

# विधानसभेसाठी काँग्रेसला हवी मनसेची साथ

## लोकसभेच्या निकालानंतर होणार निर्णय!



**मुंबई- लोकसभेचे निकाल २३ मे रोजी जाहीर झाल्यानंतर त्याचे विश्लेषण करून मुंबई व महाराष्ट्रातील काँग्रेस नेत्यांची दिल्लीतील हायकमांडसोबत बैठक घेण्यात येणार आहे. या बैठकीत प्रामुख्याने मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या झंझावती प्रचारामुळे किती मते मिळाली याचा आढावा घेण्यात येणार आहे. त्यानुसार आगामी विधानसभेला राज यांच्या मनसेसोबत आघाडी करावी का, याबाबत खल होणार असल्याचे समजते.**




लोकसभा निवडणुकीत मनसेमुळे नेमका किती मतात फायदा झाला, याचा ऊहापोह केला जाईल त्यानंतर त्यांना सोबत घ्यायचे का यावर हायकमांड सोबत प्राथमिक चर्चा होईल. राष्ट्रवादी काँग्रेसने लोकसभा निवडणुकीला मनसे सोबत घ्यावे अशी भूमिका घेतली होती. पण तेव्हा काँग्रेसमधील नेते अशोक चव्हाण, संजय निरूपम यासह काही नेत्यांनी मनसेला सोबत घेण्यास विरोध केला होता. लोकसभा निवडणुकीत बिहार उत्तर प्रदेशात उत्तर भारतीय विरोधात राज ठाकरे यांची भूमिका आघाडी केल्यास फटका बसेल अशी शंका या काँग्रेस नेत्यांना होती, त्यामुळे राज ठाकरे थेट सहभागी न होता अशोक चव्हाण सुशीलकुमार शिंदे यांच्या प्रचारासाठी अप्रत्यक्षरित्या राज ठाकरे यांनी मदतच केली.

आता लोकसभा निकाल नंतर नेमका मनसे फायदा किती झाला याचा उहापोह केला जाणार आहे. राज्यातील विधानसभा निवडणुकीत काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी सोबत मनसे घेण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे काँग्रेस वरिष्ठ सूत्रांनी सांगितले. अर्थात या सर्व निर्णय काँग्रेस हायकमांड अर्थात राहुल गांधीच घेतील असे त्यांनी आवर्जून नमूद केले.

लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात सर्वाधिक चर्चा कोणाची झाली असेल तर ती महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या सभांची होय. लोकसभा निवडणूक न लढवता राज यांनी राज्यात अनेक ठिकाणी सभा घेतल्या. या सभांमधून त्यांनी मोदी आणि भाजप सरकारवर जोरदार टीका केली. लोकसभा निवडणुकीची घोषणा होताच राज ठाकरे काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या महाआघाडीचा एक भाग असेल असे बोलले जात होते. पण प्रत्यक्षात तसे झाले नाही. अर्थात राज यांनी त्याआधीच लोकसभा निवडणूक लढवणार नसल्याचे सांगितले. राज्यात या वर्षाअखेरीस होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत मनसे आणि राष्ट्रवादी एकत्र येण्याची शक्यता आहे.

लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादीला राज ठाकरे यांना सोबत घ्यायचे होते. पण राज ठाकरे यांनी उत्तर भारतीयांना केलेला विरोध यामुळे काँग्रेसने त्यास नकार दिला होता. असे असले तरी राज यांनी लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात भाजप विरुद्ध प्रचार केला होता. मुंबईतील एका सभेत तर त्यांनी शिवसेनेला देखील मत देऊ नका, असे आवाहन केले होते.

लोकसभा निवडणुकीत राज सोबत असल्यास त्याचा फटका उत्तर भारतात बसू शकतो, असे काँग्रेस नेत्यांना वाटत होते. त्यामुळेच त्यांनी राज ठाकरे यांना सोबत घेण्यास नकार दिला होता.




# संशयाचा धूर!

## दादरमधल्या पोलीस वसाहतीत आग

## १५ वर्षांच्या मुलीचा मृत्यू



**मुंबई** - दादर येथील पश्चिमेला असलेल्या पोलीस वसाहतीमधील एका इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर आग लागली आहे. या दुर्घटनेत एका मुलीचा मृत्यू झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पाच क्रमांकाच्या इमारतीतील तिसऱ्या मजल्यावर आग लागली. घटनास्थळी अग्निशमन दलाच्या आठ गाड्या दाखल झाल्या होत्या. अग्निशमन दलानं अथक परिश्रम करत आगीवर नियंत्रण मिळवलं. मात्र यामध्ये श्रावणी अशोक चव्हाण हिचा 'वय १५ वर्ष' मृत्यू झाला आहे. दरम्यान, श्रावणीनं आत्महत्या केल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. ज्यावेळेस ही घटना घडली त्यावेळेस तिचे आई-वडील एका लग्नसोहळ्यासाठी गेले होते. श्रावणीच्या घराला बाहेरून कुलूपदेखील लावण्यात आलेले होतं. त्यामुळे ही केवळ दुर्घटना होती की श्रावणीनं आत्महत्या केली? याबाबतची अधिकृत माहिती अद्यापपर्यंत समोर आलेली नाही. पोलीस याप्रकरणी अधिक तपास करत आहेत.

# समस्त हिंदु आघाडीचे संस्थापक मिलिंद रमाकांत एकबोटे जबर झालेल्या मारहाणीत ठार



**पुणे-** मिळालेल्या माहिती नुसार, सासवड येथील झेंडेवाडीमध्ये मंगळवारी रात्री साडे नऊ वाजण्याच्या सुमारास हरिनाम सप्ताह निमित्त मिलिंद एकबोटे हे आले होते. पंडित मोडका गोशाळा चालवितो आणि तोच गाड्या पकडतो, भ्रष्टचार करतो, अशा स्वरूपाची पोस्ट एकबोटेंनी फेसबुकवर लिहिली होती. या रागातून मोडक आणि त्यांच्या ४० ते ४५ समर्थकांनी एकबोटे यांच्यावर हल्ला केला. मोडक यांच्या समर्थकांनी एकबोटे आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना लाथाबुक्क्या, दगड आणि मिरचीची पूड टाकून मारहाण केली. तेव्हा त्यांच्यावर ससून रुग्णालय येथे उपचारा दरम्यान मृत्यू झाला.

# खासगी कारचालकांना भाडं घ्यायला मान्यता, सरकार बनवतेय नवा नियम

**मुंबई-** जर तुमच्याकडे स्वतःची कार असेल तर आता त्याद्वारे तुमची अतिरिक्त कमाई सुरू होऊ शकते. कारण, सरकार परिवहन कायद्यात मोठा बदल करण्याचा विचार करत आहे. एका बातमीनुसार, 'व्हेइकल पूलिंग' योजनेचा केंद्र सरकार विचार करत आहे.

देशभरात खासगी वाहनांची संख्या झपाट्याने वाढत आहे, परिणामी ट्रॅफिक आणि पार्किंगची समस्या दिवसेंदिवस मोठी होत आहे. त्यामुळे रस्त्यावरील खासगी वाहनांची संख्या कमी व्हावी यासाठी केंद्र सरकारडून खासगी गाड्यांचा वापर कमर्शियल (व्यावसायिक) कारणासाठी करता यावा म्हणून परमिट जारी करण्याचा विचार सुरू आहे. नीति आयोगाने यासाठी एक पॉलिसी तयार केली आहे. मात्र, ही सेवा सुरू करण्यासाठी कार मालकांना काही नियम आणि अटींची पूर्तता करावी लागेल. खासगी कारचालक दिवसाला ३ ते ४ फेऱ्याच



कमशिऱ्यल ट्रिपच्या करू शकतो, असा त्यात नियम असणार आहे. प्रवाशांची सुरक्षा निश्चित करण्यासाठी खासगी वाहनांसाठी नियमावली बनवली जाणार आहे. त्यासाठी खासगी वाहन चालकांना राज्य परिवहन विभागातील मान्यता प्राप्त समीक्षकाकडून KYC (know your customer) प्रक्रिया पूर्ण करावी लागेल. समीक्षकाकडे वाहनाचा पूर्ण तपशील असेल जेणेकरुन कार मालक एका दिवसात तीन किंवा चार पेक्षा अधिक फेऱ्या मारु शकणार नाही, आणि नियम तोडल्यास तातडीने त्यावर कारवाई करता येणं शक्य होईल.

# 'क्लोरल हायड्रेट'चे धागेदोरे नाशिकमध्ये! मोठ्या प्रमाणात ड्रग केमिकल हस्तगत



**मुंबई: ताडी बनविण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या 'क्लोरल हायड्रेट' या ड्रग केमिकलचे धागेदोरे नाशिकमध्ये असल्याची धक्कादायक माहिती शनिवारी उघडकीस आली आहे. याठिकाणी असलेल्या एका कारखान्यात धाड टाकत लाखो रुपयांचे ड्रग केमिकल हस्तगत करण्यात खार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दया नायक आणि आरे पोलिसांच्या पथकाला यश मिळाले आहे. याप्रकरणी कारखाना मालकाला त्यांनी अटक केल्याचे समजते.**

आरे पोलिसांच्या हद्दीत मोडणाऱ्या युनिट १ आणि ३१ मध्ये खार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दया नायक यांनी मुंबईतील २५० तडीच्या दुकानांना क्लोरल हायड्रेट या विषारी ड्रग केमिकलचा पुरवठा करणाऱ्या व्यंकटा करबुय्याला (४६) त्याच्या अन्य दोन साथीदारांसह अटक केली होती. तसेच त्यांच्याकडून ४५ लाख ३४ हजार ३०० रुपयांचे केमिकलही हस्तगत करण्यात आले होते. मात्र लोकांच्या जीवाशी खेळणारे हे ड्रग केमिकल त्यांनी कुठून आणले याबाबत चौकशी सुरू होती.

सुरुवातीला ताकास तूर लागू न देणाऱ्या संशयित आरोपींच्या कसून चौकशीत या रसायनची लिंक नाशिकमध्ये असल्याचे नायक यांना समजले. त्यानुसार ते आरे पोलिसांसह नाशिकला रवाना झाले. त्यांनी नाशिकच्या दिंडोरी परिसरात एका मोठ्या करखान्यावर धाड टाकली. या धाडीत कारखान्यातुन मोठ्या प्रमाणात हे ड्रग केमिकल त्यांना सापडल्याचे सुत्रांचे म्हणणे आहे. याची किंमतही लाखो रुपयांच्या घरात असल्याचे समजते.

# बचत गटांच्या महिलांची ९१ लाखांची फसवणूक



**पुणे- वडगाव शेरी परिसरातील बचतगटाच्या महिलांना गुंतवणुकीवर मोठा परतावा देण्याचे अमिष दाखवून ९१ लाख ६२ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी शिवजित मुद्रा क्रेडीट को. ऑ प. सोसायटीच्या संचालक मंडळाविरोधात चंदननगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.**

याबाबत मीना मोहन इंगळे (वय ४०, रा. वडगाव शेरी) यांनी तक्रार दिली आहे. त्यानुसार श्री महालक्ष्मी नारायण महासंघाचे संस्थापक शिवाजी तुकाराम ढमढेरे, अध्यक्ष मंदाराणी शिवाजी ढमढेरे, विजय थोरात, अंजली थोरात, सविता विजय थोरात, श्री महालक्ष्मी नारायण महासंघ संचलित शिवजित मुद्रा क्रेडीट को. ऑप. सोसायटीच्या संचालक मंडळाविरोधात महाराष्ट्र ठेवीदारांचे हितसंरक्षण अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वडगाव शेरी भागातील महिलांना श्री महालक्ष्मी नारायणी महासंघाकडून बचत गटाची स्थापना करण्याचे सुचविण्यात आले होते. त्यानुसार तक्रारदार यांच्यासह इतर महिलांनी बचत गटाची स्थापना करून महिलांकडून ठेवी स्वीकारण्यात आल्या. त्यांना गुंतवणुकीवर चांगला परतावा देण्याचे आमिष दाखविण्यात आले होते. महिलांकडून जमा करण्यात आलेल्या ठेवी शिवजित मुद्रा मल्टीस्टेट क्रेडीट को. ऑ प. सोसायटीत ठेवण्यात आल्या होत्या. ठेवींची मुदत संपल्यानंतर महिलांना मुद्दल, व्याज, लाभांश देण्यात आलेले नाही. बचतगटातील महिलांनी याबाबत विचारणा केली. त्या वेळी बँकेच्या बारामती, लोणंद भागात शाखा असल्याचे सांगण्यात आले. बचतगटातील महिलांना गुंतवणुकीस भाग पाडण्यासाठी लकी ड्रॉसारखी योजना सुरू करण्यात आली होती.

# लोकसभेचा 'त्रिशंकू' निकाल लागल्यास 'हे' त्रिकूट ठरवणार सरकार!

*नवी दिल्ली - लोकसभा निवडणुकीतील सहाव्या टप्प्याचं मतदान १२ मे रोजी होतंय. त्यानंतर, १९ मे रोजी सातव्या आणि शेवटच्या टप्प्यांत ५९ जागांवर मतदान होईल आणि मग सगळयांच्या नजरा खिळतील, त्या २३ मे या तारखेवर. लोकसभेचा महासंग्राम कुणी जिंकला, हे या दिवशी ठरणार आहे. २७२ ची 'मॅजिक फिगर' कोण गाठणार, याबद्दल राजकीय वर्तुळात तर्कवितर्क लढवले जात आहेत. यावेळी कुठल्याच पक्षाला स्पष्ट बहुमत मिळणार नाही, असा अंदाज काही जण वर्तवताहेत. तो जर खरा ठरला आणि लोकसभा त्रिशंकू झाली, तर पुढचं गणित तीन राज्यांतील ती नेत्यांवर अवलंबून असेल. हे त्रिकूट 'किंगमेकर' का ठरू शकतं, हे आकडे पाहून सहज लक्षात येईल.*

यंदाच्या लोकसभा निवडणुकीत बहुतांश पक्षांनी, आपण कोणत्या गटाचे, हे आधीच जाहीर केलं आहे. एनडीए किंवा यूपीएसोबत नसलेले पक्षही काय वेळप्रसंगी आपलं कौल कुणाला देतील, हे स्पष्ट दिसतंय. याला तीन नेते अपवाद आहेत. ओडिशाचे मुख्यमंत्री आणि बीजू जनता दलाचे नेते नवीन पटनायक, तेलंगणाचे मुख्यमंत्री आणि टीआरएसचे नेते केसीआर आणि वायएसआर काँग्रेसचे अध्यक्ष जगनमोहन रेड्डी या तिघांनीही आपले पत्ते अद्याप उघडलेले नाहीत. त्यामुळे लोकसभेचे निकाल त्रिशंकू लागल्यास या त्रिकुटाला 'अच्छे




दिन' येतील.

ओडिशा (२१), आंध्र प्रदेश (२५) आणि तेलंगणा (१७) या तीन राज्यांमध्ये लोकसभेच्या ६३ जागा आहेत. २०१४च्या लोकसभा निवडणुकीत बीजू जनता दलाने २०, वायएसआर काँग्रेसने ९ आणि टीआरएसने ११ जागा जिंकल्या होत्या. म्हणजेच, ६३ पैकी ४० खासदार या तीन पक्षांचे होते. यावेळी त्यांची ताकद वाढल्याचं राजकीय वर्तुळात बोललं जातंय. म्हणजेच, ते यावेळीही 'चाळिशी' सहज पार करू शकतात आणि त्या जोरावर भाजपा किंवा काँग्रेसला ४४० व्होल्टचा झटका देऊ शकतात.

आंध्र प्रदेशच्या सर्व २५ जागांवर ११ एप्रिलला मतदान झालं आहे. इथे चंद्राबाबू नायडू यांचा टीडीपी आणि जगनमोहन रेड्डी यांचा वायएसआर काँग्रेस या दोन पक्षांमध्ये थेट लढत आहे. कुणाशीही आघाडी न करता, हे दोन्ही पक्ष स्वबळावर रिंगणात उतरलेत. चंद्राबाबूंनी मोदी सरकारविरोधात धडक मोर्चा उघडल्याचं पाहायला मिळालं. सत्तेतून बाहेर पडल्यावर त्यांची काँग्रेससोबतची जवळीक वाढली. एका म्यानात या दोन तलवारी राहणं थोडं कठीण असल्यानं जगनमोहन रेड्डी एनडीएच्या गोटात येऊ शकतात. अर्थात, जो आंध्र प्रदेशला विशेष राज्याचा दर्जा देईल, त्याला पाठिंबा देण्याची भूमिका त्यांनी आधीच जाहीर केली आहे.

# झोपडीत मूळ मालक राहत नसल्यास पात्रता रद्द होणार!

**मुंबई- झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत पात्र ठरलेल्या झोपडीधारकाऐवजी संबंधित झोपडीत मूळ मालकाऐवजी अन्य व्यक्ती राहत असल्याचे आढळल्यास मूळ झोपडीधारकाची पात्रताच रद्द करण्याचे आदेश आता प्राधिकरणाला देण्यात आले आहेत. यामुळे अशी झोपडी अपात्र ठरवून ती थेट पाडण्याचे आदेश प्राधिकरणाला मिळणार आहेत. त्यामुळे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत 'डमी' झोपडीधारकांकडून होणारा अडथळा आता दूर होऊन अनेक रखडलेल्या योजना मार्गी लागणार आहे.**

झोपडपट्टी पुनर्वसन योजनांमध्ये येणारे अडथळे दूर व्हावेत, यासाठी प्रयत्नशील असलेल्या राज्य शासनाने 'एक झोपडी, एक व्यक्ती' हे धोरण प्रभावीपणे अमलात आणण्याचे ठरवले आहे. आतापर्यंत १५०० हून अधिक योजनांना परवानगी देण्यात आली आहे. मात्र इरादा पत्र जारी होऊनही योजना मार्गी लागण्यात अडथळे येत असल्याचे आढळून आले आहे. झोपडीधारकांची पात्रता यादी (परिशिष्ट दोन) संबंधित योजना ज्या भूखंडावर आहे त्या यंत्रणेला जारी करावी लागते. ही यादी मिळाल्यानंतर विकासक झोपडपट्टी योजना सादर करतो. योजना मंजूर झाल्यावर इरादा पत्र जारी केले जाते. त्यानंतर झोपडी पाडण्यास सुरुवात केली जाते. ही कारवाई करताना अनेक योजनांमध्ये झोपडीधारकांकडून झोपडी पाडण्यात अडथळे निर्माण केले जातात. विरोध करणारे झोपडीधारक हे पात्रता यादीतील रहिवासी नसल्याचे आढळून आले आहे. प्रत्येक योजनांत असे झोपडीधारक १५ ते ५० टक्के असल्याचे आढळून आले आहे. हे 'डमी' झोपडीधारक या झोपडीवर आपला हक्क प्रस्थापित करण्यासाठी न्यायालयाचे दरवाजे ठोठावतात. त्यामुळे योजनांना विलंब लागत असे. त्यामुळे मूळ झोपडीवासीऐवजी अन्य कोणी आढळल्यास संबंधित झोपडीवासीयाला अपात्र करण्यात आले तर झोपडी भाड्याने देण्याचे वा विकण्याचे प्रकार कमी होतील आणि या योजनेत खराखुरा झोपडीवासीय लाभार्थी ठरेल, अशा रीतीने धोरण तयार करण्याचे प्रस्तावित होते. ते अखेर तयार झाले असून तशा सूचना राज्याच्या गृहनिर्माण विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव संजय कुमार यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपक कपूर यांना दिल्या आहेत. त्यामुळे आता पात्र ठरल्यानंतर झोपड्या विकणारे वा भाड्याने देणाऱ्या झोपडीधारकांविरुद्ध कारवाई करण्याचे आदेश प्राधिकरणाला मिळाले आहेत. हे 'डमी' झोपडीधारक प्राधिकरणासाठी डोकेदुखी ठरले होते.



## पाणीटंचाईमुळे भाजीपाल्यांचे दर वाढले, गृहिणींचे बजेट कोलमडले, विवाह खर्च वाढला

**मुंबई-** रायगड जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याबरोबरच सिंचनासाठी लागणाऱ्या पाण्याचीही टंचाई निर्माण झाल्याने भाजीपाल्याचे भाव वाढले आहेत. सध्या लग्न समारंभ मोठ्या



प्रमाणात असल्याने भाजीपाल्याची मागणी वाढली आहे; परंतु पेण, वडखळ बाजारासह गावोगावच्या आठवडा बाजारात भाजीपाल्याची आवक कमी व मागणी जास्त असल्याने भाव वाढले आहेत, यामुळे गृहिणीचे बजेट कोलमडले आहे तर लग्न समारंभाच्या खर्चात वाढ झाली आहे. सध्या बाजारात वांगी ७० रुपये किलो, भेंडी ६० रुपये किलो, टोमॅटो ५० रुपये किलो, मटार ८० रुपये किलो, मिरची ७० रुपये किलो, गवार ५० रुपये किलो, फरसबी ६० रुपये किलो, कोथिंबीर जुडी ५० रुपये, मेथी जुडी २५ ते ३० रुपये तर फ्लॉवर, कोबी, शिमला मिरची, शेवग्याच्या शेंगा यांचे दरही मोठ्या प्रमाणात वाढले आहेत.

रायगड जिल्ह्यातील अनेक गावांत सध्या पिण्याच्या पाण्याबरोबर शेतीच्या पाण्याची टंचाई भेडसावत आहे. विहिरी कूपनलिकांची पाण्याची पातळी कमालीची खालावली असून नवीन कूपनलिका खोदताना सुमारे ३०० फुटांपर्यंत पाणी लागत नसल्याने भूगर्भातील पाण्याची पातळी खाली गेल्याने येथील स्थानिक भाजीपाल्याचे उत्पादन घटले आहे.

## मुंबईकरांसाठी मेट्रो-६ मार्गिका ठरणार वरदान, २०21 मध्ये होणार कार्यान्वित

**मुंबई-** समर्थनगर-जेव्हीएलआर-सीप्झ-कांजूरमार्ग ही मेट्रो-६ मार्गिका मुंबईकरांना भविष्यात वरदान ठरणार आहे. ही मार्गिका प्रस्तावित असलेली चार मेट्रो स्थानके आणि दोन रेल्वे स्थानकांना जोडणार असल्याने प्रवाशांना जलद गतीने आणि सहजतेने प्रवास करणे शक्य होणार आहे. समर्थनगर-जेव्हीएलआर-सीप्झ-कांजूरमार्ग ही मेट्रो-६ मार्गिका १५ किलोमीटर लांब प्रस्तावित आहे. या मार्गिकेच्या कामाला डिसेंबर महिन्यात सुरुवात झाली असून या संपूर्ण मार्गावर बॅरिकेटिंगचे काम पूर्ण झाले आहे. मेट्रो-६ ही मार्गिका दहिसर पश्चिम ते डी.एन. नगर ही मेट्रो २ अ, अंधेरी पूर्व ते दहिसर पूर्व ही मेट्रो-७, कुलाबा-वांद्रे-सीप्झ ही मेट्रो-३ आणि वडाळा-घाटकोपर-मुलुंड-ठाणे ही मेट्रो-४ अशा प्रस्तावित असलेल्या चार मेट्रो प्रकल्पांना छेदणार आहे. यासह पश्चिम उपनगरातील जोगेश्वरी स्थानक आणि पूर्व उपनगरातील कांजूरमार्ग रेल्वे स्थानक या दोन रेल्वे स्थानकांना मेट्रो-६ मार्गिका जोडणार असल्याने मुंबईकरांना या ठिकाणी गाडी बदलता येणार आहे. यामुळे आपल्या इच्छित स्थळी जाण्यास कमी अवधी आणि कमी अंतर



कापावे लागणार असल्याने त्यांचा प्रवास जलद आणि सुखकर होणार आहे. मेट्रो-६ या मार्गिकेवर एकूण १३ मेट्रो स्थानके प्रस्तावित आहेत. यामध्ये स्वामी समर्थनगर, आदर्शनगर, मोमीननगर, जेव्हीएलआर, श्यामनगर, महाकाली गुफा, सीप्झ गाव, साकी विहार रोड, राम बाग, पवई तलाव, आय आय टी पवई, कांजूर मार्ग, विक्रोळी पूर्व द्रुतगती महामार्ग अशी स्थानके असणार आहेत. यामध्ये इन्फिनिटी मॉलजवळ मेट्रो-६ मार्गिका मेट्रो-२ अ या मेट्रो मार्गिकेला जोडणार आहे, तर जेव्हीएलआर या ठिकाणी मेट्रो-७, सीप्झ येथे मेट्रो-३, तर कांजूरमार्ग या ठिकाणी मेट्रो-४ या मार्गिकेला जोडणार आहे. यामुळे प्रवाशांना जलद गतीने मार्ग बदलून आपल्या इच्छित स्थळी पोहोचता येणार आहे. तसेच मेट्रो-६ मार्गिका जोगेश्वरी आणि कांजूरमार्ग या पश्चिम आणि पूर्व स्थानकांना जोडणार असल्याने पूर्व उपनगर विक्रोळी ते जोगेश्वरीदरम्यान प्रवासामध्ये ४५मिनिटांची बचत होणार आहे.

## स्वाइन फ्लूने घेतला १३५ जणांचा बळी

**मुंबई-** सध्या राज्यात अनेक ठिकाणी उष्णतेची लाट आहे. एरव्ही थंडीत आढळणाऱ्या स्वाइन फ्लूने आता उन्हाळ्यातही डोके वर काढले आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यात गेल्या पाच महिन्यांमध्ये स्वाइन फ्लूचे तब्बल १३५ बळी गेले आहेत, तर राज्यात १ हजार ४८६ स्वाइन फ्लूचे रुग्ण असून, पुण्यातील चार रुग्ण सध्या व्हेंटिलेटरवर आहेत. नाशिकमध्ये ३३, नागपूर १६, पुणे मनपा १२ आणि अहमदनगर १४ बळी असून, शहर, तसेच जिल्ह्यांमध्ये स्वाइन फ्लूमुळे दगावलेल्यांची संख्या अधिक आहे.

थंडीचे वातावरण स्वाइन फ्लू विषाणूच्या प्रसारासाठी पोषक असते, असा सर्वसाधारण समज आहे. यंदा मात्र, थंडी संपून उन्हाळा सुरू झाला, तरी स्वाइनचे रुग्ण आढळत आहेत. १ जानेवारी, २०१९ ते ७ मे, २०१९ पर्यंत राज्यात १ हजार ४८६ स्वाइनचे रुग्ण आढळले. १७ हजार ८७५ संशयितांना ऑसेलटॅमिवीर गोळ्या देण्यात आल्या, तर पाच महिन्यांत १ हजार १७५ रुग्ण संपूर्ण बरे झाले आहेत. राज्यातील विविध रुग्णालयांमध्ये अद्यापही १७६ रुग्ण उपचार घेत आहेत.

राज्याचे सर्वेक्षण अधिकारी डॉ. प्रदीप आवटे म्हणाले, राज्यात



उन्हाळ्याच्या तीव्र झळा जाणवण्यास सुरुवात झाली असली, तरी अनेक ठिकाणी रात्रीचे, सकाळचे तापमान आणि दिवसभराचे तापमान यात तफावत आहे. त्यामुळे स्वाइन फ्लू बाधित रुग्णांची संख्या अद्याप शून्यावर आलेली नाही. स्वाइन फ्लू सदृश लक्षणे दिसणाऱ्या रुग्णांचे स्थलांतर हादेखील चिंतेचा विषय आहे. त्यामुळे विषाणूचा प्रसार होण्याची प्रक्रिया सुरूच राहाते.

## लिंबू सरबत, उसाचा रस घातक

**मुंबई-** उन्हाचा पारा वाढला की नागरिकांचा ओढा आपोआप लिंबू सरबत, उसाचा रस, लस्सी, ताक याकडे वळतो; परंतु उघड्यावर विक्री केल्या जाणाऱ्या या पेयांचा नागरिकांच्या आरोग्याला धोका अधिक असल्याचे दिसून येत आहे. सरबतासाठी वापरले जाणारे पाणी दूषित असल्याचे पालिकेच्या आरोग्य विभागाच्या पाहणीत आढळून आले आहे. या विभागाने एप्रिलमध्ये मुंबईतील २४ वॉर्डातील सरबतांचे नमुने तपासले असता त्यापैकी ८१ टक्के नमुने दूषित आढळून आले आहेत.



दर वर्षीप्रमाणे पालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने एप्रिल महिन्यात २४ विभागांमधील फेरीवाल्यांकडील लिंबू सरबते आणि उसाच्या रसाच्या नमुन्यांची तपासणी केली होती. कुर्ला स्थानकातील लिंबू सरबत बनवतानाचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर पालिकेने सरबत, उसाचा रस आणि बर्फगोळा विक्रेत्यांवर धडक कारवाई सुरू केली. मार्च महिन्यातील तपासणीनंतर एप्रिल महिन्यातही तब्बल ८१ टक्के नमुने दूषित आढळल्याचे समोर आले आहे. मार्चमधील कारवाईत ८७ टक्के नमुने दूषित आढळले होते.

मुंबईमध्ये उन्हाचा तडाखा जाणवू लागल्यामुळे आणि त्यातच घामाच्या धारा वाहत असल्यामुळे सतत काही तरी सरबत पिण्याची इच्छा होत असते. त्यातूनच या काळात सरबते विकणाऱ्यांचा धंदा जोरात सुरू आहे. मात्र हे सरबत विक्रेते जे पाणी किंवा बर्फ वापरतात तो किती घातक आहे तेच या तपासणीवरून लक्षात येत आहे. खाद्य व पेय पदार्थ विकणाऱ्या फेरीवाल्यांकडील बर्फ हा 'आइस फॅक्टरी'मध्ये तयार होत असल्याने त्याबाबत कारवाई करण्याचे अधिकार अन्न व औषध प्रशासन विभागाला असतात. त्यामुळे पालिका दर वर्षी केवळ नमुन्यांची तपासणी करून वास्तव मांडत असते.



## मुंबईकरांवर वीजदरवाढीचे संकट

**मुंबई-** स्वस्त वीज आधी वापरण्याच्या तत्त्वामुळे मुंबईत अनेकदा महावितरणला वीज पुरवणाऱ्या राज्यातील प्रकल्पांची वीज वापरली जात असून त्यापोटी केवळ वीजदरच नव्हे तर स्थिर आकारही देण्याबाबतचा अंतरिम आदेश राज्य वीज नियामक आयोगाने दिला आहे. त्यामुळे सुमारे १४० कोटी रुपयांचा बोजा पडणार असल्याने मुंबईकरांवर वीजदरवाढीचे संकट ओढवण्याची चिन्हे आहेत. मुंबईसह राज्यातील वीजग्राहकांवर महाग विजेचा थेट बोजा पडू नये यासाठी विजेची मागणी पुरवताना आधी स्वस्त वीज वापरण्याचा नियम (मेरिट ऑर्डर डिस्पॅच) राज्य वीज नियामक आयोगाने केला आहे. मुंबईला वीज पुरवणाऱ्या टाटा प्रकल्पाचे काही संच आणि डहाणूमधील वीजप्रकल्पाच्या तुलनेत राज्यातील काही वीजप्रकल्पांची वीज स्वस्त आहे. त्यामुळे वीज मागणी आटोक्यात असताना अनेकदा डहाणू आणि टाटाच्या विजेऐवजी मुंबईत राज्यातील वीजप्रकल्पांची वीज वापरली जाते. तिचा हिशेब करून वीजदर देण्याची पद्धत आहे. मात्र, केवळ वीजदर न देता संबंधित वीजप्रकल्पांपोटीचा स्थिर आकारही मुंबईतील वीजवितरण कंपन्यांनी द्यावा, अशी मागणी करणारी याचिका महावितरणने दाखल केली होती. या स्थिर आकारापोटी २०० कोटी रुपये टाटाने, २०० कोटी रुपये बेस्टने तर ३०० कोटी रुपये अदानी कंपनीने द्यावेत, अशी महावितरणची मागणी होती. त्यावर वीज आयोगाने अंतिम निकालाआधी २० टक्केरक्कम देण्याचा अंतरिम आदेश दिला. त्यामुळे मुंबईकरांवर जवळपास १४० कोटींचा बोजा पडत असल्याचे वीजतज्ज्ञ अशोक पेंडसे यांनी सांगितले. अंतरिम आदेशानंतर नुकतीच या प्रकरणावर सुनावणी झाली असता टाटा पॉवरने ४० कोटी रुपये भरल्याचे स्पष्ट झाले. बेस्टने मात्र आर्थिक परिस्थितीचे कारण देत हात वर केले आहेत.

## कमी पगार द्या; पण 'जेट' सुरू करा, कर्मचाऱ्यांची मागणी

**मुंबई-** आर्थिक कारण देत बंद करण्यात आलेल्या जेट एअरवेजच्या कर्मचाऱ्यांच्या शिष्टमंडळाने शुक्रवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान कमी पगार दिला तरी चालेल, पण कंपनी सुरू करा, अशी विनंती त्यांनी केली. दरम्यान, २३ मे नंतरच या प्रकरणी सरकार हस्तक्षेप करेल, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी शिष्टमंडळाला दिले.

शिष्टमंडळात ऑल इंडिया जेट एअरवेज ऑफिसर्स अँड स्टाफ असोसिएशनचे अध्यक्ष, आमदार किरण पावसकर, विरोधी पक्षनेते धनंजय मुंडे, कमिटी मेंबर्स आणि केबीन क्रू सहभागी झाले होते. त्यांनी मगण्यांचे निवेदन मुख्यमंत्र्यांना दिले. जेट एअरवेज कंपनीची मुंबईमध्ये नोंदणी झाली आहे. या कंपनीची उड्डाणे १७ एप्रिल २०१९ पासून बंद झाली आहेत. परिणामी २२ हजार कर्मचाऱ्यांसमोर रोजगाराचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळेच कंपनी पुन्हा सुरू करून कर्मचाऱ्यांना न्याय द्यावा, अशी कर्मचाऱ्यांची मागणी आहे. जेटची उड्डाणे १७ एप्रिल २०१९ पासून बंद आहे. गेल्या सात वर्षांत बंद होणाऱ्या एअरलाइन्स कंपन्यांपैकी जेट ही





सहावी कंपनी असून, दुसरी मोठी कंपनी आहे. २०१२ साली विजय मल्ल्या याची किंगफिशर एअरलाइन्स बंद झाली. यानंतर, एअर पेगसस, एअर कोस्टा, एअर कार्निवल आणि जूम एअर या कंपन्यांनीही आपली उड्डाणे बंद केली होती.

जेटच्या वैमानिकांसह अभियंत्यांना ऑगस्ट २०१८ पासून टप्प्याटप्प्याने वेतन मिळत होते. त्यानंतर, गेल्या चार महिन्यांपासून कर्मचाऱ्यांना वेतन मिळालेले नाही. कंपनीला बँकांकडून दीड हजार कोटी मिळतील आणि किंचित दिलासा मिळेल, अशी आशा कर्मचाऱ्यांना होती. मात्र, तसे झाले नाही. २५ मार्चला बँकांनी जेटला दीड हजार कोटी दिले जातील, असे म्हटले होते. मात्र, जेटला केवळ तीनशे कोटीच टप्प्याटप्प्याने मिळाले. परिणामी, याचाही जेटला फायदा झाला नाही. तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार, या प्रकरणात काहीही होऊ शकते. जोवर लिलावाची प्रक्रिया पूर्ण होत नाही, तोवर प्रतीक्षा करावी लागेल. ही एकंदर परिस्थिती लक्षात घेता, आता कमी पगार द्या, पण जेट सुरू करा, अशी मागणी कर्मचाऱ्यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन केली.

## बालमृत्यूंत १७ टक्क्यांनी वाढ

### पालिका विभागांतील स्थिती; सर्वाधिक बालमृत्यूंची नोंद मुंबईत

मुंबई महानगर प्रदेशात बालमृत्यूमध्ये घट झाल्याचा दावा पालिकेकडून केला जात असला तरी त्यात गेल्या वर्षांच्या तुलनेत वाढ झाली आहे. सर्वाधिक बालमृत्यूंची नोंद मुंबई पालिका विभागात झाली असून पाच वर्षांखालील बालमृत्यूच्या आकडेवारीतही हेच चित्र निदर्शनास येत आहे. राज्यात मात्र बालमृत्यूंमध्ये किंचित घट झाल्याची नोंद आहे.



राज्यातील ग्रामीण क्षेत्रामध्ये बालकांच्या आरोग्य सुविधांवर भर दिला जात असून बालमृत्यू कमी करण्यात काही अंशी यश मिळाले असल्याचे फेब्रुवारी २०१७ ते २०१९ च्या आरोग्य माहिती व्यवस्थापन प्रणालीच्या आकडेवारीतून स्पष्ट होते. बालमृत्यू अधिक असलेल्या आदिवासीबहुल भागातील पालघरमध्ये एक वर्षांखालील बालमृत्यूचे प्रमाण ४२ टक्क्यांनी तर पाच वर्षांखालील बालमृत्यू जवळपास ६० टक्क्यांनी घटले. नाशिक, गडचिरोली, अमरावती भागात एक वर्षांखालील बालकाच्या मृत्यूचे प्रमाण घटल्याचे आश्वासक चित्र असले तरी ठाणे, नंदुरबार येथे मात्र हे प्रमाण दखल घेण्याइतपत वाढले आहे.

## आर्थिक दुर्बलांच्या प्रवेशांवरही टांगती तलवार

**मुंबई-** राज्यातील वैद्यकीय आणि दंतवैद्यकच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या यंदाच्या प्रवेश प्रक्रियेत १६ टक्के मराठा आरक्षण लागू न करण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिल्याने आतापर्यंत केलेले प्रवेश रद्द करावे लागले आहेत. या मुद्द्याचा आधार घेत खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बलांसाठीच्या (ईडब्ल्यूएस) १० टक्के आरक्षणाअंतर्गत केलेले प्रवेशही रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाच्या सुट्टीकालीन खंडपीठासमोर पुढील आठवड्यात सुनावणी होणार असून या आरक्षणातून प्रवेश निश्चित केलेल्या विद्यार्थ्यांच्या डोक्यावर टांगती तलवार आहे. पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू झाल्यानंतर मराठा आरक्षण लागू करण्यात आले होते. त्यामुळे पूर्वलक्ष्यी प्रभावाने ते लागू करता येणार नाही, असे म्हणत त्याला विद्यार्थ्यांनी केलेला विरोध सर्वोच्च न्यायालयाने ग्राह्य ठरविला आणि वैद्यकीय आणि दंतवैद्यकच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या यंदाच्या प्रवेश प्रक्रियेत मराठा आरक्षण लागू न करण्याचे आदेश दिले. नेमका हाच मुद्दा खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांसाठी १० टक्के आरक्षण लागू करण्याच्या निर्णयाला विरोध करणाऱ्या विद्यार्थ्यांचा आहे. १० टक्के आरक्षणाबाबत १०३वी घटनादुरूस्ती करण्यात आली. मात्र हे आरक्षण यंदा नव्हे, तर पुढील शैक्षणिक वर्षापासून लागू करण्याचे केंद्र सरकारने स्पष्ट केले होते.

## १५४ पंप उपसणार पावसाचे साचलेले पाणी

**मुंबई-** पश्चिम रेल्वे मार्गावरील मरिन लाइन्स, मुंबई सेंट्रल, दादर, माटुंगा रोड, माहिम, वांद्रे, अंधेरी, बोरीवली, नालासोपारा, विरार या भागांत मागील वर्षी जास्त प्रमाणात पाणी साचण्याच्या घटना घडल्याने या वर्षी या ठिकाणी १५४ पंप मशीन बसविण्यात येणार आहेत. पश्चिम रेल्वेद्वारे चर्चगेट ते विरारमधील नाल्यांची सफाई ६० टक्के पूर्ण झाली आहे. यासह नाल्यांची खोली करण्याचे काम सुरू आहे. रेल्वे रुळावरून पाणी वाहून जाण्यासाठी रेल्वे रूळ मार्गाच्या किनारी भागाला उतार देण्यात आला आहे. आतापर्यंत सुमारे १ लाख ६० हजार क्युबिक मीटर चिखल, माती, रेती बाहेर काढून विशेष लोकलद्वारे हा घनकचरा या परिसरातून बाहेर नेला आहे.



रेल्वे हद्दीतील कमकुवत फांद्यांची आणि झाडांची छाटणी केली जाणार आहे. पश्चिम रेल्वेद्वारे लोकलमधील खिडकी आणि दरवाजे यांची तपासणी करून खिडकी आणि दरवाज्यांना दुरुस्त करण्यात येणार आहे. छत आणि पन्हाळी यांची देखभाल करण्यात येणार आहे. सिग्नल यंत्रणा आणि ओव्हर हेड वायरची दुरुस्तीचे कामे हाती घेण्यात आली आहेत. मान्सूनवेळी रेल्वे कर्मचाऱ्यांना गमबूट, रेनकोट देण्यात येणार आहेत. यासह अन्य सामग्रीची सोय उपलब्ध करून देण्यात येणार आहे. जोरदार पाऊस पडण्याच्या वेळी अधिकारी वर्ग २४ तास रेल्वे मार्गावर लक्ष ठेवणार आहे. पावसाचे पाणी भरल्याने गर्दीचे प्रमाण एका ठिकाणी वाढते. त्यामुळे एका ठिकाणी जास्त गर्दी झाल्यास उद्घोषणेद्वारे गर्दी कमी करण्याची घोषणा केली जाणार आहे. यासह सीसीटीव्हींद्वारे गर्दीच्या ठिकाणांवर लक्ष ठेवले जाणार आहे. रेल्वे स्टॉलवर खाद्यपदार्थांच्या वस्तू जास्त प्रमाणात ठेवण्यात येणार आहेत.

कोकण रेल्वे प्रशासनाने मान्सूनपूर्व उपाययोजना सुरू केल्या आहेत. बोगद्यामध्ये किंवा इतर खडकाळ भागात दरड कोसळण्याच्या घटना घडतात.

## दुष्काळ निवारणासाठी केंद्राकडून आणखी २१६० कोटी रुपये

**मुंबई-** दुष्काळ निवारणासाठी केंद्र सरकारकडून आणखी २१६० कोटी रुपयांचा मदतनिधी महाराष्ट्राला मिळाला असून, त्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले. राज्यातील दुष्काळ निवारणासाठी केंद्रकडून राज्याला सातत्याने मदत होत आहे. दुष्काळ निवारणासाठी राज्य सरकारही मोठ्या प्रमाणात पुढाकार घेत असून टँकर, चारा छावण्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दिलासा दिला जात आहे. केंद्राच्या मदतीची वाट न पाहता चार हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेची मदत यापूर्वीच शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आली आहे. आतापर्यंत एकूण ४२४८.५९ कोटी रुपये केंद्र सरकारकडून राज्याला मिळाले.

## संपादकीय...

# दरवर्षी दुष्काळ येतच राहणार, कारण...


संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक

राज्यातील एकूण ४१ हजार गावांपैकी तब्बल २९ हजार गावांमध्ये दुष्काळ आहे. याचा अर्थ अर्ध्याहून अधिक ग्रामीण महाराष्ट्राचा घसा कोरडा पडला आहे. जमिनीला आणि शेतकऱ्यांच्या आयुष्याला पडलेल्या भेगा कोणत्याही शासकीय योजनांनी भरल्या जात नाहीत. ३० ऑक्टोबर २०१८ रोजी सरकारने १७,९८५ गावे दुष्काळग्रस्त घोषित केली होती. ही संख्या अवघ्या चार महिन्यांत २९ हजारांवर गेली. दुष्काळ किती तीव्र आहे हे यावरून कळेल. राज्यात चारा छावण्यांच्या आश्रयाला ८ लाख जनावरे आली आहेत.

शेतीचा शाश्वत विकास करण्याची भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सातत्याने मांडत आले आहेत, पण राजकीय इच्छाशक्ती कमी पडते की प्रशासन कळत नाही? नवीन सरकार आले की नव्या घोषणा येतात, नव्या कल्पना येतात. पण अंमलबजावणीकडे म्हणावे



तेवढे लक्ष दिले जात नाही. भाजप-शिवसेनेचे सरकार सत्तेवर आले त्या वेळी जलसिंचनाचे जे प्रकल्प ७० ते ८० टक्के पूर्ण झाले आहेत ते प्राधान्याने पूर्ण केले जातील, असे सांगण्यात आले. त्यातील किती प्रकल्प पूर्ण झाले? आणि झाले असतील तर त्या भागातही दुष्काळ का, याचे कोडे उलगडत नाही. २०१०-११ पासून राज्यातल्या सिंचित क्षेत्राची आकडेवारी दिली नाही म्हणून आघाडी सरकारला श्वेतपत्रिका काढायला भाग पाडणाऱ्या भाजप-सेनेने स्वत: सत्तेवर आल्यापासून आजपर्यंत गेल्या चार वर्षांत किती क्षेत्र सिंचनाखाली आले याची आकडेवारी दिलेली नाही. जर घोषणा केल्याप्रमाणे ७० ते ८० टक्के काम पूर्ण झालेले सिंचन प्रकल्प या चार-साडेचार वर्षांत पूर्ण झाले असतील तर त्यांची आकडेवारी सरकार का देत नाही. हे तर सरळ सरळ स्वत:च्या भूमिकेपासून पळ काढणे आहे.

जलयुक्त शिवार योजना चांगली होती, लोकांचा सहभागही होता. मुळात 'माथा ते पायथा' अशी कल्पना ही योजना राबवताना होती, पण तसे काहीच न करता ही योजना पुढे ठेकेदारांचे हित जपण्यासाठी राबवली, असे मत ज्येष्ठ जलतज्ज्ञ राजेंद्रसिंह यांनीही मांडले. त्यातील भ्रष्टाचाराच्या कथा बाहेर आल्या, पण पाण्याच्या कामात भ्रष्टाचार करणाऱ्यांना आजपर्यंत कधीही कठोर शासन झाले नाही. त्यामुळे अधिकारी व नेते बेलगाम झाले. राज्यात एक लाख वीस हजार विहिरी चार वर्षांत खोदल्या गेल्या असे सांगण्यात आले. त्यावर राज ठाकरे यांनी आक्षेप घेतले तेव्हा सरकारने ३५ हजार विहिरींची यादी त्यांच्याकडे पाठवली. मग बाकीच्या विहिरी गेल्या कुठे? एवढ्या विहिरी आणि लाखो बोअरवेलमुळे जमिनीची पुरती चाळणी झाली आहे.

रेन वॉटर हार्वेस्टिंग सक्तीचे केले, पण कोणत्या सोसायट्या ते करतात, करत नाहीत, याची कोणतीही तपासणी केली जात नाही. ही योजना न राबवणाऱ्यांवर कारवाई झाल्याची एकही घटना नाही. यवतमाळ जिल्ह्यातील गणेशवाडी, पुसदमधील लोणी, नगर जिल्ह्यातील हिवरेबाजार, राळेगणसिद्धी ही गावे जर सरकारी योजना राबवून दुष्काळमुक्त होऊ शकतात तर त्याच योजना राज्यातल्या ४० हजार गावांमध्ये का राबवल्या जात नाहीत?

२०१७-१८ मध्ये राज्यात १८७ साखर कारखाने चालू होते. ज्यांनी ९४७ लाख मेट्रिक टन उसाचे गाळप केले आणि २०१८-१९ मध्ये तब्बल १९५ साखर कारखान्यांनी ९५० लाख मेट्रिक टन उसाचे गाळप केले आणि याच राज्यातली जनता पाण्यासाठी आणि जनावरे चारा-पाण्यासाठी आसुसली आहेत, यासारखा दैवदुर्विलास दुसरा नाही. महाराष्ट्रातील शेती पावसावर अवलंबून आहे, हे माहिती असूनही पडणाऱ्या पावसाचे नियोजन केले जात नाही. आपल्यापेक्षा कितीतरी कमी पाऊस इस्त्रायलमध्ये पडतो. मात्र त्या देशाने पाण्याचे केलेले नियोजन बघायला जगातले लोक जातात. आपलेही अनेक अधिकारी इस्त्रायलला शेतीचे प्रयोग बघून येतात. मात्र ते प्रयोग आपल्याकडे कधीच राबवत नाहीत. ठिबक सिंचनाचा वापर करून इस्त्रायलने शेतीचे नियोजन केले, भरघोस पिके घेतली. मात्र आपल्याकडे पाण्यावर आधारित पिकांचे नियोजन करण्याची कोणाचीही तयारी नाही. आपण उसाला वारेमाप पाणी देतो. अनेक ठिकाणी कालव्यात पाइप टाकून पंपाने पाणी ओढले जाते आणि ते सरळ उसाच्या शेताला सोडले जाते. मात्र विरोध उसाला पाणी देण्याचा नाही, पण सरकार उसाला ठिबक सिंचनाद्वारेच पाणी द्या, अशी सक्ती करत नाही. ज्याच्याकडे पाणी तो मनाला येईल तेवढे पाणी वापरतो. लातूरला रेल्वेने पाणी देण्याची वेळ आली, पण तेथे असणारे साखर कारखाने बंद झाले नाहीत. सोलापूर जिल्ह्यात ४० कारखाने आहेत आणि चारा छावण्या व टँकरही चालूच आहेत..! या छावण्या राजकीय व आर्थिक फायद्यासाठी राबवल्या जातात हे उघड गुपित आहे.


# या आत्महत्यांना जबाबदार कोण?



**परीक्षेत अनुत्तीर्ण होणे हे आत्महत्या करण्यास जर पुरेसे कारण असू शकेल, तर आयुष्यात येणाऱ्या अतिशय गुंतागुंतीच्या परिस्थितीत माणसे कशी तग धरून राहू शकतील, असा प्रश्न तेलंगणातील २० विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांमुळे विचारला जाऊ लागेल. दहावी आणि बारावीच्या परीक्षेत हे विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले आणि त्या धक्क्याने त्यांना जीवन संपवण्याचा मार्ग पत्करावा लागला, हे तेथील परीक्षा मंडळांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे. परीक्षा घेणे, ही नेहमीच अतिशय कठीण व्यवस्था असते.**

विशेषत: आठ-नऊ लाख विद्यार्थ्यांच्या एकाच वेळी परीक्षा घेताना, या परीक्षा मंडळांची तारांबळ उडत असते. परीक्षेचा निकाल, ही तर त्यांच्यावरील सर्वात महत्त्वाची जबाबदारी. त्या बाबतीत हलगर्जीपणा होणे कधीच परवडणारे नसते. तेलंगणामध्ये असे झाले असावे, असा प्राथमिक निष्कर्ष आहे. उत्तरपत्रिका तपासण्याचे काम तेलंगणा परीक्षा मंडळाने एका खासगी कंपनीकडे सोपविले होते. या कंपनीच्या कामावर देखरेख करणे आणि त्यामध्ये कोणत्याही पातळीवर गडबड होणार नाही, याची काळजी घेणे, हे तर परीक्षा मंडळाचेच काम असायला हवे. परंतु ते झाले नसावे, असे दिसते. सारवासारव करण्यासाठी आत्महत्या करणारी मुले फार हुशार नव्हती, असा दावा करण्याने परीक्षा पद्धतीवरील विश्वास मात्र वाढू शकत नाही. तेलंगणा राज्यात सध्या बारावीच्या निकालावरून जो काही गोंधळ झाला आहे यावरून परीक्षा मंडळ किती हलगर्जी असू शकते हे लक्षात येते. हा निकाल जाहीर झाल्यावर आठवडाभराच्या अंतरात २० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याने सध्या हा विषय भलताच संवेदनशील झाला आहे. तेलंगणात सुमारे नऊ लाख विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली होती. यापैकी तीन लाख विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले. अनेक हुशार विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले. परीक्षा दिलेले विद्यार्थी गैरहजर दाखविण्यात आले. शून्य गुण मिळालेल्या एका विद्यार्थिनीला १०० पैकी प्रत्यक्षात ९९ गुण मिळाल्याचे उघड झाले.

विद्यार्थी अनेक कारणांनी सध्या तणावात आहेत. कधी स्वत:पाशी पुरेशा पदव्या नसल्याची त्यांना चिंता वाटते तर कधी शिक्षणाच्या दर्जाने ते चिंतित असतात. वाढलेली फी, रोजगारासाठी आवश्यक कौशल्याचा अभाव, परीक्षेनंतर मूल्यांकनातील घोटाळे, उशिरा लागणारे निकाल आणि उत्तीर्ण झाल्यावर रोजगाराच्या संधी न मिळणे, हीदेखील त्यांच्या चिंतेची कारणे असतात. त्यामुळे विद्यार्थी जर तणावाखाली



असतील तर ते आपल्या पद्धतीने त्यावर प्रतिक्रिया देतात किंवा बाह्य जगताचे चुकीचे आकलन करतात. त्यासाठी जबाबदार कोण? अति ताणामुळे किंवा परिस्थितीला तोंड देण्यास कमी पडल्याने विद्यार्थी दबावाखाली येतात. अशावेळी सरकारचे किंवा समाजाचे कर्तव्य काय असते?

कधी कधी अतिरिक्त ताण हा व्यक्तीला अधिक कार्यप्रवणही करू शकतो. अस्तित्वासाठी त्याची गरजही असते. धोका समोर दिसत असताना त्याचा मुकाबला केव्हा करायचा किंवा त्यापासून दूर केव्हा जायचे, हेही आपल्याला समजत असते. पण एखादवेळी अनेक प्रश्नांना एकाचवेळी सामोरे जाण्याचा प्रसंग येऊन त्याचा सामना करण्यास व्यक्ती कमी पडते तेव्हा ती स्थिती अपायकारक ठरू शकते. तेलंगणात अशी स्थिती निर्माण झाल्यावर काय करायला हवे, याचा अंदाज न आल्याने २२ विद्यार्थ्यांनी आत्महत्या करण्याचा मार्ग पत्करला. तेलंगणा राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाचा निकाल १८ एप्रिलला जाहीर झाला. तो लावताना सॉफ्टवेअरमधील त्रुटींमुळे गुण आणि परीक्षा क्रमांक यांची अनेक ठिकाणी योग्य जुळवणी न झाल्याने अनेक विद्यार्थी नापास घोषित झाले. त्यामुळे निराशेने घेरून काहींनी आत्महत्या केली. एखाद्याने आत्महत्या केल्यावर त्याच्यामागे जे आप्त असतात, त्यांच्यात अपराधीपणाची भावना निर्माण होते, पण याची पूर्वकल्पना तरी कुणाला असते?

जाणीवपूर्वक जर कुणासाठी तणावाची स्थिती निर्माण करण्यात आली तर त्याला तोंड द्यावे लागणाऱ्या व्यक्तीला भावनिक आघाताला सामोरे जावे लागते. या वेळी त्या स्थितीला सामोरे गेलेले विद्यार्थी त्यांना झालेल्या त्रासाबद्दल नुकसानभरपाई मिळण्यासाठी परतही येऊ शकत नाहीत. त्यांच्या पालकांना तुटपुंज्या नुकसानभरपाईच्या रकमेवर समाधान मानावे लागते. तेवढ्याने समाजाला किंवा सरकारला स्वत:च्या जबाबदारीतून मुक्त होता येते का?

मुलांनी आत्महत्या केल्याचे लक्षात आल्यावर आणि पालकांकडून त्या घटनांचा निषेध व्यक्त होऊ लागल्यावर तेलंगणा सरकारने सर्वच विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांचे विनामूल्य फेरमूल्यांकन करण्याचा निर्णय घेतला. याला न्याय म्हणायचे? जर नियमात फेरमूल्यांकनाची तरतूद होती तर ते यापूर्वीच का करण्यात आले नव्हते? सरकारने या घटनेकडे उपेक्षेने का बघितले? या घटनेला स्वत:हून दखलपात्र ठरवून सर्वोच्च न्यायालयाने त्याविरोधात सार्वजनिक हितयाचिका का दाखल करून घेतली नाही आणि सरकारच्या काम करण्याच्या पद्धतीवर कोरडे का ओढले नाहीत? आपण सर्व जण समाज या नात्याने किंवा एक राष्ट्र म्हणून त्याविषयी शोकदेखील व्यक्त करीत नाही? आपण इतके असंवेदनशील झालो आहोत का?

आत्महत्या हा तात्पुरत्या प्रश्नाचा कायमचा तोडगा असतो. पण अशा प्रश्नांना सामोरे जाण्यासाठी आपण एखादी पद्धत निर्माण करू शकलो आहोत का? आत्महत्या ही अनेकदा माणसाच्या भेकडपणातून जन्माला येत असते, पण ती नेहमीच तशी नसते. २०१६ साली १५ ते ३९ या वयोगटातील २,३०,३१४ माणसांनी आत्महत्या केली होती. दरवर्षी संपूर्ण जगात १० लाख लोक आत्महत्या करतात, त्यात १७ टक्के लोक भारतातील असतात! त्यातही दक्षिणेकडील राज्यात हे प्रमाण भयावह आहे आणि त्यात पुरुषांचे प्रमाण जास्त आहे. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात चढ-उतार हे येतच असतात. ते जेव्हा आपल्या आवाक्यात असतात तेव्हा आपण त्यांना समर्थपणे तोंड देतो. पण ते जेव्हा आवाक्याबाहेर जातात, तेव्हा माणसाच्या मनात डिप्रेशन येते. त्यामुळे त्याला त्या संकटाला आपण तोंड देऊ शकत नाही, याची लाज वाटते. ती असह्य झाली की माणूस आत्महत्येला प्रवृत्त होतो. तेलंगणात नेमके असेच झाले.

# ४५०७ इमारती धोकादायक

**ठाणे-** शहरातील बेकायदा आणि धोकादायक इमारतींच्या पुनर्वसनासाठी समूह विकास योजनेची आखणी केली जात असली तरी यंदाच्या पावसाळ्यातही धोकादायक इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांवर टांगती तलवार कायम रहाणार आहे. महापालिकेने नुकत्याच केलेल्या सर्वेक्षणात ठाणे, कळवा, मुंब्रा, दिवा या महापालिका हद्दीत ४५०७ धोकादायक इमारती आढळून आल्या आहेत. त्यापैकी १०३ इमारती अतिधोकादायक म्हणून गणल्या गेल्या असून त्या रिकाम्या करून पाडण्याची कारवाई पालिकेने सुरू केली आहे.



शहराच्या मध्यवर्ती भागात म्हणजेच नौपाडा परिसरात सर्वाधिक अतिधोकादायक इमारती असून, यापूर्वी वागळे इस्टेट परिसर अतिधोकादायक इमारतीत आघाडीवर होता. वागळे इस्टेट परिसरातील बहुतांश अतिधोकादायक इमारती जमीनदोस्त केल्याने या विभागात आता तीन अतिधोकादायक इमारती असल्याचे महापालिकेच्या सर्वेक्षणात स्पष्ट झाले आहे. वागळे इस्टेट परिसरात समूह विकास योजनेच्या माध्यमातून पुनर्विकास योजना राबवली जाणार आहे. मात्र येथील इमारतींचे सर्वेक्षण आणि पुढील प्रक्रिया अत्यंत संथगतीने सुरू असल्याने या भागातील रहिवाशांमध्ये नाराजीचा सूर व्यक्त होत आहे. गेल्यावर्षीच्या तुलनेत वागळे इस्टेट परिसरात धोकादायक इमारतींच्या संख्येतही दोनशेने घट झाली आहे. ठाणे, वागळे, कळवा आणि मुंब्रा या भागांत मोठ्या प्रमाणात बेकायदा इमारती आहेत. अशा इमारती पावसाळ्यात कोसळून त्यामध्ये जीवितहानी झाल्याच्या घटना गेल्या काही वर्षांत घडल्या आहेत. शीळ येथील लकी कंपाऊंड इमारत दुर्घटनेत ७४ जणांचा मृत्यू झाला होता. तसेच नौपाड्यातील जुन्या अधिकृत इमारतीही मोडकळीस आल्या असून याठिकाणीही इमारत दुर्घटना घडल्या आहेत.

# कुपोषणग्रस्त तालुके राहीले उपाशी, जव्हार, मोखाड्यावर अन्याय

**जव्हार - शासनाने दुष्काळग्रस्त यादीमध्ये मोखाडा, जव्हारचा अंतर्गाव केला असला तरी पोषण आहार योजनेतुन त्याना वगळल्याने येथील कुपोषणाची समस्या वाढणार आहे. विषेश म्हणजे राज्यात बहुतांश जिल्ह्यात दुष्काळाची स्थिती आहे. पालघर जिल्ह्यातील मोखाडा, जव्हार , पालघर, विक्र मगड, तलासरी आणि वसई तालुक्यातील ३५ गावे शासनाने दुष्काळग्रस्त जाहीर केले आहेत.**

शालेय सुट्टीच्या काळातही दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना पोषण आहार देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार जिल्ह्यातील पालघर, विक्र मगड आणि तलासरी या तीन तालुक्यांमध्ये शालेय पोषण आहार राबविण्याचे आदेश पालघर जिल्हा परिषदेतील शिक्षणाधिकारी यांनी दिले आहेत. परंतु, अतिदुर्गम, कुपोषणाच्या विळख्यात अडकलेल्या आणि दुष्काळग्रस्त जाहीर केलेल्या जव्हार, मोखाडा या दोन्ही तालुक्यांना त्यातुन वगळण्यात आले आहे.

दुष्काळाचा मुकाबला करण्यासाठी शासन विविध उपाययोजना करीत आहे. त्याचाच एक भाग म्हणजे, दुष्काळग्रस्त भागातील कुटुबांना दिलासा मिळावा म्हणून शासनाने जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय सट्ट्यांमध्ये, शालेय पोषण आहार (मध्यान्ह भोजण) देण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. त्याचा फायदा दुष्काळग्रस्त भागांना



होणार आहे. पालघर जिल्ह्यात पालघर, विक्र मगड, तलासरी, जव्हार, मोखाडा आणि वसई तालुक्यातील ३५ दुष्काळग्रस्त जाहीर केले आहेत. मात्र, शालेय सुट्टीमध्ये शालेय पोषण योजना राबविण्यासाठी जिल्ह्यातील पालघर, विक्र मगड आणि तलासरी या तालुक्यांनाच आदेश, जिल्हा शिक्षणाधिकारी राजेश कंकाळ यांनी दिले आहेत. त्यामुळे जव्हार, मोखाडा या अतिदुर्गम आणि कुपोषणाच्या विळख्यात अडकलेल्या तालुक्यांना शासनाने दुर्लक्षित ठेवुन अन्याय केल्याचा आरोप आदिवासीं पालकांनी केला आहे. दरवर्षी या भागामध्ये कुपोषणाची समस्या डोके वर काढीत असल्याने जव्हार व मोखाड्यावर हा अन्याय मानला जात आहे.

# तारापूरमध्ये ह्रदयरोग, अस्थमा अन् त्वचारोग, वायू गळतीचा जीवघेणा प्रवास

**बोईसर-** तारापुर औद्योगिक क्षेत्रामध्ये वायुगळती व वायुप्रदूषणाचा जीव घेणा प्रवास सुरु असून तो दिवसेंदिवस वाढत आहे. त्याची वेळीच उपाययोजना न केल्यास एक दिवस तारापुर गॅस चेम्बर बनून मोठी दुर्घटना होण्याची शक्यता आहे. दरम्यान, नेहमीच्या या वायुप्रदूषणामुळे हृदयरोग व अस्तमा याबरोबरच त्वचा आजारात मोठी वाढ झाली आहे.



ऑक्टोबर २०१८ या महिन्यात तारापूर एम.आय. डि. सी.मध्ये एका कारखान्याच्या बागायतीतील झाडाजवळ असंख्य चिमण्या मृत्यूमुखी पडल्या होत्या. एका नाल्यांमधून मोठ्या प्रमाणात वाहत जाणाऱ्या पिवळ्या रंगाच्या रासायनिक सांडपाण्यातून बाहेर पडलेल्या विषारी वायु व उग्रवासामुळे चिमण्या मृत्यू पावल्या होत्या. तर, त्या चिमण्यांना पाणी पाजून वाचिवण्याचा प्रयत्न करणा-या तेथील टपरीचालकाला ही त्या उग्र वास व वायुचा त्रास होऊन चक्कर आली होती. जानेवारी २०१९ या महिन्यांमध्ये औद्योगिक क्षेत्रातील 'के' झोन मधील बंद व जुन्या रासायनिक सांडपाण्याच्या पाईप लाईनमध्ये घातक रासायनिक सांडपाणी अनधिकृत पद्धतीने सोडल्याने त्या मधून बाहेर पडलेल्या विषारी वायूमुळे त्या परिसरातील काम कारखान्यात काम करणा-या कामगारांना व रस्त्यावरून जाणा-या असंख्य नागरिकांना डोळ्याची जळजळ व श्वसनाचा त्रास इत्यादी प्रकारचे त्रास जाणवू लागल्याने कामगार काम बंद करून सुरिक्षत स्थळी पळाले होते. बजाज हेल्थ केयर या कारखान्यात वायुगळती होऊन कामगारांना डोळ्याला त्रास झाला होता त्यांच्यावर बोईसर मधील वेगवेगळ्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.


# चार महिन्यांत ६६७२ श्वानदंश

**वसई-** वसई विरार शहरात भटक्या श्वानांचा उपद्रव वाढलेला असताना दुसरीकडे वसईतील एकमेव श्वान निर्बीजीकरण केंद्र बंद पडल्याची बाब उघड झाली आहे. पालिकेने मात्र श्वान निर्बीजीकरण केंद्र पुन्हा सुरू झाल्याचा दावा केला आहे. मात्र तरी ते बंदच असल्याचे आढून आले आहे. गेल्या चार महिन्यांत साडे सहा हजाराहून अधिक जणांना श्वान दंश झाल्याचा घटना वसई-विरार भागात घडल्या असल्याचे समोर आले आहे.

वसई विरार शहरात भटक्या श्वानांच्या वाढत असलेल्या उपद्रवांमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. भटके श्वान नागरिक आणि लहान मुलांवर हल्ला करतात. त्यामुळे नागरिकांत भीतीचे वातावरण आहे. वसई पूर्वेतील भागातील नवघर येथे पालिकेचे श्वान निर्बीजीकरण करण्याचे एकमेव केंद्र आहे. एकाच केंद्रावर संपूर्ण शहाराचा निर्बीजीकरणाचा भार आहे. त्या केंद्रामार्फत शहरात फिरणाऱ्या भटक्या श्वानांना लस



देऊन त्याचे निर्बीजीकरण केले जात आहे. दिवसातून १८ ते २० श्वानांचे निर्बीजीकरण केले जात आहे. आजवर २५ हजारांहून अधिक श्वानांचे निर्बीजीकरण झाले असल्याची माहिती महापलिकेच्या वतीने देण्यात आली आहे.



# कचरा गाडीतून पडणाऱ्या घाणपाण्यामुळे मीरा-भाईंदरमध्ये रहिवाशी त्रस्त

**मीरारोड-** मीरा भाईंदर महापालिकेच्या कचरा उचलणाराया ठेकेदाराच्या कॉम्पॅक्टर व टॅम्पोमधून ओल्या कचऱ्यातले घाणेरडे पाणी रस्त्यावर सांडून दुर्गंधी पसरत असल्याने आरोग्याच्या समस्याने शहरातील नागरिक त्रस्त आहेत. घाण पाण्याचे डाग सुध्दा कायम रहात आहेत. या प्रकरणी भाईंदरच्या बालाजी नगर मधील रहिवाशांनी पालिका आयुक्तांकडे तक्रार केली आहे. तर बहुतांश ओला कचरा वेगळा वाहून नेला जात असल्याने कॉम्पॅक्टरमधून कचऱ्यातील घाणपाण्याची धारच लागते.

मीरा भाईंदर शहरात सुरुवातीपासूनच आेला व सुका कचरा एकत्रच नेला जात होता. पण गेल्या तीन- चार वर्षांपासून ओला व सुका कचरा वेगळा करुन त्याची वाहतूक करण्यासाठी पालिकेने नागरिकांना सातत्याने आवाहन केले आहे. कचरा वाहतुकीसाठी ठेकेदारा मार्फत ७ टनाचे ४२ कॉम्पॅक्टर , ३ टनाचे २४ बंदिस्त टॅम्पो तर दिड टनाचे १३ बंदिस्त टॅम्पो वारपले जात आहेत. या शिवाय खुले डंपर सुध्दा रोजचे २५ च्या घरात कचरा वाहतुकीसाठी उपयोगात आणले जात आहेत. शहरात रोजचा निघणारा सुमारे ५०० टन ओला व सुका कचरा या वाहनांमधून उत्तनच्या धावगी डोंगरावरील कचरा प्रकल्पात नेऊन टाकला जात आहे. ओल्या कचरायाचे वर्गीकरण करुन देण्याचे प्रमाण वाढल्याने पालिकेने ओल्या व सुक्या कचऱ्यासाठी स्वतंत्र वाहनं वापरात आणली आहेत. ओल्या कचरायात घाणपाण्याचे प्रमाण अधिक असल्याने कॉम्पॅक्टर मध्ये ओला कचरा टाकल्यावर तो यांत्रिक पध्दतीने दाबला की आतील घाणपाण्याची धार रस्त्यावरच लागते. त्यामुळे जेथे कचरा भरण्यासाठी कॉम्पॅक्टर थांबवला जातो त्या ठिकाणी हे अतिशय घाण पाणी सांडून परिसरात दुर्गंधी पसरते. या घाणपाण्याचे रस्त्यावर पडलेले डाग सुध्दा निघत नाहीत. याचा रहिवाशी आणि पादचाऱ्यांना खुपच त्रास होत आहे.



# पाच वर्षे स्थिर सरकार देणे हेच उद्दिष्ट

**सातारा - पंतप्रधानपदाची संधी कोणाला मिळणार ही गोष्ट आमच्यासाठी गौण आहे. स्वतःचा विचार न करता एकवाक्यता करण्याला आमचे प्राधान्य असून बहुमत करायचे व पाच वर्षे स्थिर सरकार द्यायचे हेच उद्दिष्ट असल्याचे खा. शरद पवार म्हणाले. राज्य सरकारने दुष्काळाकडे गांभीर्याने पहावे. आचारसंहिता आहे म्हणून निर्णय घ्यायला विलंब लावणे योग्य नाही. निर्णय तातडीने घेणे गरजेचे आहे, पण ते घेतलेले नाहीत, अशा शब्दात त्यांनी राज्य सरकारला फटकारले.**

रयत शिक्षण संस्थेच्या कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. संपूर्ण देशात परिवर्तनाला अनुकूल स्थिती दिसत असून परिवर्तनाला समर्थन देणाऱ्या घटकांना एकत्र आणले पाहिजे. या अनुषंगाने चंद्राबाबू नायडू आपल्याशी बोलले असून इतर सर्वांशी ते बोलणार आहेत, असे पवार यांनी सांगितले.

मागच्या निवडणुकीत काँग्रेस-राष्ट्रवादीला महाराष्ट्रात सहा जागा मिळाल्या होत्या. आपण काही ज्योतिषी नाही. पण यावेळी फार सुधारणा होईल असे वाटते. साताराची जागा येईल याबद्दल शंका नाही, पण किती मतांनी येईल सांगता येत नाही, असे ते म्हणाले.

माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या-विषयी नरेंद्र मोदी यांनी काढलेल्या वक्तव्याबद्दल पवार यांनी त्यांची निर्भत्सना केली जी व्यक्ती हयात नाही, ज्यांचा मृत्यू क्लेशदायक झाला, ज्या कुटुंबातील दोन व्यक्तींची देशासाठी हत्या झाली त्यांच्याबद्दल अशी भाषा करणे शोभादायक नाही. रोज आपण अशी भाषा ऐकत आहोत. हे चांगले लक्षण नाही. महाराष्ट्रात निवडणूक प्रचारादरम्यान मोदी यांनी लक्ष्य केल्याविषयी विचारले असता, मोदींनी लक्ष्य केले याचा अर्थ माझे ठीक चालले आहे, अशी मिश्किल टिप्पणी त्यांनी केली.

इव्हीएम मशिनमधील ५० टक्के मतांची मोजणी करण्याविषयीची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्याविषयी विचारले असता पवार म्हणाले, गुजरातमध्ये घड्याळाचे बटण दाबल्यावर कमळाला मत जात असल्याचे आपण स्वत: पाहिले आहे. त्यामुळे मला इव्हीएम मशिनविषयी चिंता वाटते. वास्तविक आम्ही ५० टक्के मतचिठ्ठ्यांची मोजणी करण्याची मागणी केली होती. खरे तर सगळ्याच चिठ्ठ्या मोजल्या पाहिजेत. पूर्वी सर्व मोजत होते की नाही? त्यावेळी जर ते शक्य होत होते तर आता का शक्य नाही? माण-खटावच्या पिण्याच्या पाण्यासाठी ५० टँकर देणार.

# मराठा विद्यार्थ्यांना कोर्टाचा दिलासा

**मुंबई** - वैद्यकीय पदव्युत्तर प्रवेशातील मराठा आरक्षण सर्वोच्च न्यायालयाने नाकारल्याने, २१३ मराठा विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द झाले आहेत. या विद्यार्थ्यांना दिलासा देण्यासाठी त्यांना गुणवत्तेच्या आधारे प्रवेश देण्याचा निर्णय घेण्यात येणार असल्याचे समजते. या विद्यार्थ्यांना त्यासाठी सरकारी, खासगी महाविद्यालये आणि स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठाच्या पसंतीनुसार अर्ज करायचे आहेत. खासगी आणि स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठात प्रवेश मिळाल्यास, सरकारी शिक्षण शुल्कापेक्षा अतिरिक्त होणारी रक्कम राज्य सरकार अदा करणार असल्याची माहितीही सूत्रांनी दिली.


मराठा समाजाला शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये १६ टक्के आरक्षण देण्यात आले आहे. मात्र, वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी या आरक्षणानुसार देण्यात आलेले प्रवेश उच्च न्यायालयाने रद्द केले आहेत. त्यामुळे या २१३ विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. आरक्षणानुसार प्रवेशासाठी अर्ज केल्याने गुणवत्तेच्या आधारे प्रवेश मिळण्याची संधीही हुकल्याने हवालदिल झालेल्या या विद्यार्थ्यांनी सरकारला आत्महत्येचा मार्ग पत्करण्याचा इशारा दिला आहे. या विद्यार्थ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ‘वर्षा’ निवासस्थानी भेट घेतली असता, त्यांना गुणवत्तेच्या आधारे प्रवेश मिळविण्याची व शिक्षण शुल्कात सवलत देण्याची हमी देण्यात आल्याचे समजते.

विधेयकातील तांत्रिक बाबीवरून आरक्षण रद्द झाले आहे. अशावेळी आरक्षण रद्द झालेल्या



विद्यार्थ्यांना गुणवत्तेच्या आधारे प्रवेश देण्याबाबत निर्णय घेण्यात येणार आहे. त्यातून प्रवेश रद्द झालेल्या ८० ते ९० विद्यार्थ्यांना प्रवेश मिळू शकतो.

# पावसाळी अधिवेशन यंदा मुंबईतच



**मुंबई** - विधानसभेच्या निवडणुकीला सामोरे जाण्यासाठी जेमतेम चार महिनेच शिल्लक असल्याने येणारे पावसाळी अधिवेशन राज्य सरकारसाठी महत्त्वाचे असणार आहे. १७ जूनपासून होणाऱ्या पावसाळी अधिवेशनात राज्याचा अतिरिक्त अर्थसंकल्प सादर केला जाणार असून, त्यात घोषणांचा पाऊस पडणार असल्याची शक्यता आहे. राज्याचे पावसाळी अधिवेशन १७ जूनपासून मुंबईत होणार असल्याची अधिसूचना आज काढण्यात आली. विधानसभा निवडणुकीला सामोरे जाण्यापूर्वी भाजप-शिवसेना सरकारचे हे शेवटचे अधिवेशन असल्याने या वेळी आकर्षक घोषणांचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. राज्यातला दुष्काळ, कर्जमाफी, धनगर आरक्षणासारख्या प्रश्नांना या अधिवेशनात राज्य सरकारला सामोरे जावे लागणार आहे. या अधिवेशनाच्या निमित्ताने राज्य सरकारच्या पाच वर्षांचा लेखाजोखा सरकारला मांडता येणार आहे.

# पुण्यात हेल्मेट सक्तीनंतर अपघातातील मृत्यूचं प्रमाण २५ टक्क्यांनी घडलं

**पुणे-** हेल्मेट सक्तीला विरोध करणाऱ्या पुणेकरांसाठी ही बातमी महत्त्वाची आहे. हेल्मेट सक्ती आणि वाहतुकीच्या कडक नियमांमुळे पुण्यात अपघातातील मृत्यूचं प्रमाण कमी झालं आहे. हेल्मेट सक्तीनंतर पुण्यात गेल्यावर्षीपेक्षा २३ जणांचे अपघाती मृत्यू कमी करण्यात वाहतूक पोलिसांना यश आलं आहे. पुण्यातील वाहतुकीत बेशिस्तपणा असताना तेथे हेल्मेट सक्ती करण्याचा निणऱ्य पोलीस आयुक्त डॉ. के वेंकटेशम यांनी घेतला होता. मात्र सर्वच स्तरातून त्यांच्या या निणऱ्याला विरोध झाला. अनेक आंदोलने उभी राहिली. हेल्मेट सक्ती रद्द करण्यासाठी प्रचंड दबाव टाकण्यात आला. मात्र काही झालं तरी ऐकायचं नाही आणि लोकांच्या आरोपांना उत्तर देण्यापेक्षा काम करायचं अशी भूमिका पोलीस आयुक्तांनी घेतली.

वेंकटेशम यांनी पदभार स्वीकारल्यापासून अपघाती मृत्यू रोखण्यासाठी ठोस प्रयत्न करण्याचे आदेश वाहतूक शाखेला दिले होते. त्यादृष्टीने वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त पंकज देशमुख यांनी या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देण्यास सुरवात केली होती. वाहतूक शाखेने अपघातांची ठिकाणे निवडली, त्यामागील कारणे शोधली. महापालिका प्रशासनाला उपाययोजना करण्यास सांगितले होते. त्यानुसार पालिकेने अपघातप्रवण क्षेत्रांमध्ये बदल करण्यास सुरवात केली होती.

यंदाच्या वर्षातील पहिल्या चार



महिन्यांतील अपघातांमधील मृत्यूमुखी पडलेल्यांची आकडेवारी शुक्रवारी जाहीर करण्यात आली. गेल्या वर्षी पहिल्या चार महिन्यांत २८६ अपघात झाले. त्यातील ८७ अपघातांमध्ये ९२ जणांनी जीव गमावला होता. तर यंदाच्या पहिल्या चार महिन्यांत २३७ अपघात झाले, त्यामध्ये ६९ जणांचा मृत्यू झाल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. मागील वर्षीच्या तुलनेत यंदा अपघातांमध्ये मृत्यूमुखी पडणाऱ्यांची संख्या २५ टक्के घटली आहे. अपघातांचं प्रमाण एप्रिल महिन्यात ५५ टक्क्यांपर्यंत खाली आणण्यात वाहतूक शाखेला यश आलं आहे. वाहतूक शाखा, महापालिका प्रशासन व प्रसार माध्यमांच्या विशेष प्रयत्नांमुळे काही जणांचे प्राण निश्चित वाचवण्यात पुणे पोलिसांना यश आलं आहे. आणखी काटेकोर प्रयत्न आणि तीव्र अंमलबजावणी सोबत प्रबोधन वाढवल्यास हा आकडा आणखी कमी करता येऊ शकेल, अशी आशा पोलीस प्रशासनाला आहे.

# ‘त्या’ कारणाने लग्नासाठी जोडीदार मिळेना

## तरुणाने मुख्यमंत्र्यांकडे केली इच्छामरणाची मागणी

**पुणे-** आई-वडिलांची देखभाल करणारी जोडीदार मिळत नसल्यामुळे पुण्यातील एका तरुणाने चक्क मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे इच्छामरणाची परवानगी मागितली. यासाठी या तरुणाने मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले व इच्छामरणाची मागणी केली. यानंतर या तरुणाच्या पत्राची मुख्यमंत्र्यांकडून दखल घेण्यात आली व त्याचे मन वळवण्याचा पोलिसांना आदेश दिला. नैराश्येच्या गर्तेत सापडलेल्या या तरुणाला त्यातून बाहेर काढण्यासाठी पुणे पोलिसांना यश आले. पुण्यातील दत्तवाडी परिसरात राहणाऱ्या ३२ वर्षांचा या तरुणास चांगली नोकरी, चांगल्या परिसरात स्वत:चे घर असतानाही लग्नास मुलगी कुणी देत नसल्याने परस्थिती बिकट झाली. त्यामुळे आपल्या आजारी असणाऱ्या आई-वडिलांची देखभाल करणारी जोडीदार आपल्याला मिळावी अशी त्याची अपेक्षा आहे. याच कारणास्तव येणाऱ्या प्रत्येक स्थळाकडून त्याला नकार मिळत होता. यामुळे या तरुणाला नैराश्येने ग्रासले होते.

# ऐन निवडणुकीत प्रियांका गांधींनी मान्य केली आयुष्यातील सर्वात मोठी चूक

**नवी दिल्ली-** प्रियांका गांधी यांनी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सक्रिय राजकारणात एण्ट्री केली आहे. त्यांच्या एण्ट्रीने उत्तर प्रदेशच्या राजकारणावर कितीपत परिणाम होणार, याबाबत आता जोरदार चर्चाही सुरू झाली आहे. आता प्रियांका गांधी यांनी आपल्या राजकीय प्रवेशाच्या ’टायमिंग’वर भाष्य केलं आहे. प्रियांका गांधी यांनी एका खासगी वाहिनीला नुकतीच मुलाखत दिली. या मुलाखतीत प्रियांका म्हणाल्या की, ’राजकारणात उशिरा सक्रिय होणं ही माझ्या आयुष्यातील मोठी चूक होती.’ दरम्यान, प्रियांका गांधी यांनी राजकारण यावं, अशी



मागणी काँग्रेस कार्यकर्त्यांकडून अनेक वर्षांपासून करण्यात येत होती. मात्र कौटुंबिक कारणामुळे प्रियांका यांनी सक्रिय राजकारणात उडी घेण्याचं टाळलं. २०१७ मध्ये झालेल्या उत्तर प्रदेशच्या विधानसभा निवडणुकीतही प्रियांका गांधींनी नेतृत्व करावं, अशी मागणी करण्यात आली होती. मात्र प्रियांका यांनी आपल्या सक्रिय राजकारणातील प्रवेशासाठी लोकसभा निवडणुकीचा मुहुर्त निवडला. लोकसभा निवडणुकीच्या आधी प्रियांका यांना सक्रिय राजकारणात उतरवून काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी यांनी मास्टर स्ट्रोक खेळला. पण आगामी लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या जागा वाढण्यासाठी प्रियांकांचा किती उपयोग होईल हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. प्रियांका गांधी यांनी राजकारणात यावे ही मागणी २०१४च्या लोकसभा निवडणुकीपासून केली जात होती. आता प्रियांका यांनी राजकारणात प्रवेश केला आहे. केंद्रातील मोदी सरकारविरुद्ध लढताना त्यांच्या समोर अनेक आव्हाने आहेत. या आव्हानांना त्या कशा सामोऱ्या जातात त्यावर काँग्रेसचे यश ठरणार आहे.

# एटीएममध्ये पैसे अडकले असतील, तर हा नियम माहित असू द्या

**मुंबई-** अनेकदा आपण एटीएममधून पैसे काढण्यासाठी जातो, सर्व प्रक्रियाही पूर्ण होते, पण ऐनवेळी एटीएममधून पैसेच बाहेर येत नाहीत, पैसे एटमीएममध्येच अडकून पडतात. दुसरीकडे, प्रक्रिया पूर्ण झालेली असल्याने तुमच्या खात्यातून पैसे कापले जातात. असं अनेकदा अनेकांसोबत घडत असतं. आर्थिक वर्ष २०१८ मध्ये बँकेच्या लोकपाल कार्यालयाला अशाप्रकारच्या तब्बल १६ हजार तक्रारी आल्या. तर, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या रिपोर्टनुसार, गेल्या वर्षीच्या तुलनेत या वर्षी एटीएम संबंधित तक्रारींमध्ये ५० टक्क्यांनी वाढ झाली आहे.

एटीएम ट्रान्झॅक्शन फेल झाल्यानंतर तुमच्या खात्यातून जे पैसे कापले जातात, बँक ते पैसे तुमच्या खात्यात पुन्हा जमा करते. ट्रान्झॅक्शनच्या काही तासांतच पैसे पुन्हा तुमच्या खात्यात जमा केले जातात. तर कधी-कधी यासाठी काही दिवसही लागतात. पण, जर तक्रारीनंतर सात कामाच्या दिवसांत तुमचे पैसे तुमच्या खात्यात जमा झाले नाही. तर, बँकेला त्यानंतर दर दिवसाला १०० रुपये इतकी भरपाई ग्राहकाला द्यावी लागते. हा नियम १ जुलै २०११ पासून लागू झाला. जर तुमचेही एटीएम ट्रान्झॅक्शन फेल झाले असेल आणि पैसे परत आले नसतील, तर तुम्ही खालील नियमांद्वारे ते परत मिळवू शकता.

१. अशा परिस्थितीत पहिल्यांदा आपल्या बँकेशी संपर्क साधून त्यांच्याकडे यासंबंधी तक्रार करा. एटीएम कुठल्याही बँकेचं असलं तरी देखील तुम्ही बँकेकडे तक्रार करु शकता.

२. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार, प्रत्येक एटीएममध्ये संबंधित अधिकाऱ्यांचा संपर्क क्रमांक, टोल फ्री क्रमांक, हेल्प डेस्क क्रमांक



असणे अनिवार्य आहे. त्यावर संपर्क करुन तुम्ही तक्रार नोंदवू शकता.

३. जर एटीएम ट्रान्झॅक्शन फेल झाल्यानंतर तुमच्या खात्यातून पैसे कापले गेले असतील, तर बँकेला सात कामाच्या दिवसांत ते पैसे तुमच्या खात्यात पुन्हा जमा करणे अनिवार्य आहे.

४. तक्रार केल्याच्या सात दिवसांच्या आत जर तुमच्या खात्यात पैसे जमा झाले नाहीत. तर, बँकेला दर दिवसाला १०० रुपये इतकी भरपाई ग्राहकाला द्यावी लागते. यासाठी ग्राहकाला दावा करण्याची गरज नसते. मात्र, भरपाईसाठी ग्राहकाला ट्रान्झॅक्शनच्या ३० दिवसांच्या आत तक्रार दाखल करणे गरजेचं आहे.

५. जर निश्चित वेळेत तुमच्या समस्येचं समाधान झालं नाही. तर बँकेकडून उत्तर मिळाल्याच्या ३० तीस दिवसांच्या आत तुम्ही बँकेच्या लोकपालकडे यासंबंधी तक्रार करु शकता.

# मी राष्ट्रवादीच्या उमेदवाराला हरवून दोनवेळा जिंकलो हे पवार विसरतात -चंद्रकांत पाटील

**पंढरपूर** - मी शरद पवारांच्याच उमेदवाराला दोन वेळा हरवून पदवीधर मतदारसंघातून निवडून आलो आहे हे पवार विसरतात,असा टोला महसूलमंत्री चंद्रकांत पाटील यांनी लगावला आहे. मागच्या दाराने येणाऱ्यांनी एकदातरी लोकांतून निवडून यावे, अशी खोचक टीका शरद पवार यांच्याकडून वारंवार होत होत्या. यावर चंद्रकांत पाटील यांनी त्यांना उत्तर दिले. पदवीधर निवडणूक ही देखील निवडणूक असते. यासाठी ५ जिल्हे, ५८ विधानसभा आणि १० लोकसभेचे कार्यक्षेत्र असते, हे शरद पवार विसरले आहेत काय असे खोचक उत्तर पाटील यांनी पवारांना दिले. पक्षाने आदेश दिल्यास आपण विधानसभाच काय लोकसभा देखील लढवू, असे सांगत सध्या पवारांकडून होत असलेली टीका ही २३ मे जवळ येऊ लागल्याने होत असल्याचेही पाटील म्हणाले. पश्चिम महाराष्ट्रातील बारामतीसह सर्व १० जागा आम्ही जिंकणार असून पवारांना याचा अंदाज आल्यानेच बारामती हरली तर EVM मशीनमुळे हरेल, ही भाषा सुरु झाल्याचा टोला पाटील यांनी लगावला. दरम्यान, चारा छावण्यात शेतकऱ्यांशी चर्चा केल्यावरच जनावरांच्या चाऱ्यात ३ किलोची वाढ केली असून आता पेंडही रोज १ किलो देणार असल्याचे त्यांनी सांगितले.



बृहन्मुंबई महानगरपालिका
एम-पश्चिम विभाग, चेंबुर, मुंबई- ४०० ०७१
संयुक्त जयंती उत्सव समिती
जाहिर आवाहन

सविनय जयभिम , जय महाराष्ट्र !

एम/पश्चिम विभागातील सर्व कामगार, कर्मचारी, अधिकारी वर्ग यांना कळविण्यास अत्यानंद होत आहे की, सालाबादप्रमाणे ह्या ही वर्षी संयुक्त जयंती उत्सव समिती, एम/पश्चिम विभागा तर्फे तथागत गौतम बुध्द, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शाहु महाराज, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्या महापुरुषांची संयुक्त जयंती साजरी करण्यात येत आहे. तरी या महामानवांच्या जयंती निमित्त आपण व आपल्याकुटूंबासहीत सहभाग असणे फार महत्वाचे आहे. तरी कृपया आपण सर्वोतोपरी मदत करुन कार्यक्रमाची शोभा वाढवावी ही नम्र विनंती.

कार्यक्रमाची ठळक वैशिष्टये : मोफत शस्त्रक्रिया (बायपास सर्जरी, नुकताच लागण झालेला कॅन्सर सर्जरी, ॲन्जीओप्लास्टी, ॲन्जीओग्राफी, किडनी रोग, मोती बिंदू, काचबिंदू, अल्प दरात चष्मा वाटप, मोफत औषधे, आरोग्य शिबीर व रक्तदान शिबीर व इतर कार्यक्रम

सौजन्य : आश्रय सामाजिक, सांस्कृतिक शैक्षणिक ट्रस्ट यांचे
संस्थापक - मा. दिपक मोरेश्वर नाईक व सचिव - सौ. प्रिती दिपक नाईक,
आवाज फाऊंडेशन - संस्थापक - मा. सौ. सुषमा मौर्य
संस्कार सेवा संस्था - संस्थापक - मा. सौ. पिंकी पाटील
पल्लवी रक्तपेढी - मा. जयसिंग विश्वकर्मा

अवयव दानाविषयी जागृती कार्यक्रम व अंधश्रध्दा निर्मूलनावरील कार्यक्रम...

सन २०१८- २०१९ वर्षा मधील उल्लेखनीय विशेष १० वी, १२ वी, पदवीधर परिक्षा उत्तीर्ण व विशेष पदवी संपादन करणाऱ्या कर्मचारी व कर्मचाऱ्यांच्या मुलांचा सत्कार.

-: संपर्क :-

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. मोहन चौहान | श्री. महेश पेडणेकर | श्री. जितेंद्र जगताप | श्री. विजय तळेकर |
| ९८९२५२९९७० | ९९३०४९४९२४ | ९८७०६६२३४५ | ९८६९५०१९६७ |

शुक्रवार दि. १७ मे २०१९ रोजी सकाळी १०.०० ते सायं. ८.०० वाजेपर्यंत
स्थळ : एम/पश्चिम विभाग कार्यालय परिसर, चेंबूर (पूर्व), मुंबई - ४०००७१.




आश्रय सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट

आश्रय सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट व सेव्हन हिल्स हॉस्पिटल अंधेरी यांच्या संयुक्त विद्यमानाने समाजातील व गरीब लोकांसाठी किडनी, कॅन्सर, हृदयरोग, ब्रेन आदी रोगांवर निःशुल्क शस्त्रक्रिया करुन देण्यात येईल. केवळ केसरी आणि पिवळे रेशनकार्डधारक असणाऱ्यांनाच या सेवेचा लाभ मिळेल.

संस्थापकः- श्री. दीपक मोरेश्वर नाईक, मो. ८४२४९८९८९८
email:deepakmnaik@gmail.com, manavadhikar@gmail.com, www.ashraytrust.com

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)